**ठाणे येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या आवारातील जुन्या इमारती पाडण्यास मंजूरी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः जिरुठा २०१८/ प्र.क्र.३५/आरोग्य ३(अ)**
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, १० वा मजला, ए विंग
एल.टी.मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
दिनांक: ०९ मार्च,२०१८.

वाचा :-

१) **सहसंचालक, आरोग्य सेवा रुग्णालये (राज्यस्तर),मुंबई यांचे पत्र क्र. संआसे/ कक्ष-३/टे-६/जिरुठाणेश्रेणीवर्धन/जा.क्र.१२१-२२/१८, दि.१०.०१.२०१८.**

**प्रस्तावना:-**

ठाणे येथील जिल्हा सामान्य रुग्णालय हे कै.श्री.विठ्ठल सायन्ना यांनी १९३६ साली दान स्वरुपात बांधून दिलेल्या ब्रिटीशकालीन इमारतीत कार्यरत असून रुग्णालयाच्या काही इमारती अतिशय जीर्ण आणि वापरण्यास अयोग्य असल्यामुळे जुन्या इमारती पाडण्यास मंजूरी देण्याबाबत संदर्भाधिन पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

या शासन निर्णयान्वये ठाणे येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या आवारातील खालील ५ जुन्या इमारती पाडण्यास आणि जिल्हा रुग्णालयाचे राज्य कामगार विमा योजना, यांच्या वागळे इस्टेट येथील रिक्त इमारतीत स्थलांतर करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | इमारतीचे नाव |
|---|---|
| १ | Chawl-A at Thane Civil Hospital Thane |
| २ | Chawl-B at Thane Civil Hospital Thane |
| ३ | Chawl-C at Thane Civil Hospital Thane |
| ४ | Chawl-D at Thane Civil Hospital Thane |
| ५ | Chawl-E at Thane Civil Hospital Thane |

सदर इमारती पाडण्याची कार्यवाही आणि राज्य कामगार विमा योजनेच्या रुग्णालयाच्या इमारतीत जिल्हा रुग्णालयाचे स्थलांतरण करण्याची कार्यवाही केंद्र शासनाकडून याबाबतची परवानगी प्राप्त झाल्यानंतर करण्यात यावी. तसेच रुग्णांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९८८ भाग पहिला उपविभाग एक ते पाच अन्वये सुधारणा केलेल्या अ.क्र. ९ नियम क्र. ११४ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१२१००६०४२३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.03.09 16:08:48 +05'30'

**(रा.शा.कौरते)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई
२. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३. सहसंचालक, आरोग्य सेवा ( रुग्णालय-राज्यस्तर ), पुणे.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई.
५. उप संचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे.
६. सहाय्यक संचालक ( लेखा व लेखापरिक्षा ),आरोग्य सेवा, पुणे.
७. महालेखापाल १/२, महाराष्ट्र(लेखा व लेखापरिक्षा)/ लेखा व अनुज्ञेयता, मुंबई/ नागपूर.
८. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, ठाणे.
९. निवडनस्ती ( आरोग्य-३ अ ).